# “MAHADAJI SHINDE RELATIONS WITH THE BRITISH (1727-1794)”

**Minor Research Project**

**Ref.: File No. 23-731/13 (WRO) dated 30/03/2015.**

**Submitted to**

**University Grants Commission**

**Western Regional Centre, Pune.**


**Dr. Manish Kanha Chavhan**
M.A. (His.) Ph.D.
Principal Investigator
Assistant Professor and Head,
Department of History
Jawaharlal Nehru College, Wadi, Nagpur.


**Affiliated to**

**Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur**

**2017-18**

**Annexure – III**

**University Grants Commission**
**Bahadur Shah Zafar Marg**
**New Delhi – 110 002**

**First Report of the work done on the Minor Research Project.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Project Report No. | : | First Report |
| 2. | UGC reference No. | | File No. 23-731/13(WRO) dated 30/3/2015. |
| 3. | Period of Report from | : | April 2015 to March 2017 |
| 4. | Title of Research Project | : | Mahadaji Shinde Relations with the British (1727-1794) |
| 5. | (a) Name of the Principal Investigator | : | Dr. Manish K. Chavhan |
| | (b) Dept. and college where work has progressed ` | : | Jawaharlal Nehru Arts, Commerce and Science College, Wadi, Nagpur – 440023 |
| 6. | Effective date of starting of the project | : | 1st April 2015 |
| 7. | Grant Approved and expenditure In Incurred the period of the report. | : | Grant approved – Exp. Incurred for the Period |
| a) | Total Amount approved | : | Rs. 1,10,000/- (1st Inst. Rs. 70,000/-) |
| b) | Total expenditure | : | Rs. 79,954/- |
| c) | Report of the work done (Please attach separate sheet) | : | - |

| | | |
|---|---|---|
| i) | Brief objective of the project : | **Separate sheet attached** |
| ii) | Work done of far and result achieved | **Visited to various places and collected data** |
| iii) | Has the progress been according to original plan of work and towards achieving the objectives, if not, state reasons. | **Yes** |
| iv) | Please indicate the difficulties, if any, experienced in implementing the project. | **None** |
| v) | if project has not been completed, please indicate the approximate time by which it is likely to be completed. A summary of the work done for the period (annual basis) may please be sent to the commission on a separate sheet) | **Project work have been completed. Work done report enclosed in a separate sheet.** |
| vi) | If the project has been completed, please enclose a summary of the findings of the study. Two bound copies of the final report of work done may also be sent to the Commission. | **Summary submitted along with Final Report** |
| **vii)** | Any other information which would help in evaluation of work done on the project. At the completion of the project, the first report should indicate the output, such as (a) Manpower trained (b) Ph.D awarded (c) Publication of result (d) other impact if any. | - |

**Signature of the Principal Investigator**
**(Dr. M.K. Chavhan)**

**Principal**
**Jawaharlal Nehru College, Wadi, Nagpur.**

## BRIEF OBJECTIVES OF THE PROJECT

University grants commission, western regional office, Pune sanctioned, Minor Research Project to the Dr. M.K. Chavhan Jawarharlal Nehru Arts, Commerce and Science, College, Wadi, Nagpur. entitled, “Mahadaji Shinde Relation with the British (1972-1794)” vide File No. 23-731/13(WRO) dated 30/3/2015.

**अध्ययनाची उदिष्टे (Brief Objectives of the Report)**

१. महादजी शिंदे यांची ऐतिहासिक पार्श्वभुमी

२. महादजी शिंदेने पहिल्या इंग्रज मराठा युद्धात भाग घेण्याची कारणे

३. पहिल्या इंग्रज–मराठा युद्धातील महादजीची कामगीरी

४. इ.स. १७८२ मध्ये झालेल्या सालबाईच्या तहातील महादजी शिंदेची भुमिका

५. इ.स. १७८२ च्या सालबाईच्या तहानंतर महादजी शिंदेच्या राजकीय स्थितीचे अध्ययन करणे.

६. इंग्रज–मराठा संबंध प्रस्थापित करण्यामध्ये महादजी शिंदेचे योगदान

**Signature of the Principal Investigator**
**(Dr. M.K. Chavhan)**

**Principal**
**Jawaharlal Nehru College, Wadi, Nagpur.**

**Annexure – VII**

**University Grants Commission**
**Bahadur Shah Zafar Marg**
**New Delhi – 110 002**

**Final report of the work done on the minor research project**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Title of the Project | : | Mahadaji Shinde Relation with the British (1727-1794) |
| 2. | Name and Address of the principal investigator | : | Dr. M.K. Chavhan<br>Dept. of History, Jawaharlal Nehru College Wadi, Nagpur. |
| 3. | Name and address of the institution | : | Jawaharlal Nehru College Wadi, Nagpur. |
| 4. | UGC approval No. and Date | : | File No. 23-731/13 (WRO) dated 30/3/2015. |
| 5. | Date of Implementation | : | 1st April 015 |
| 6. | Tenure of the project | : | 1st April 2015 to 28th February 2017 |
| 7. | Total grant allocated | : | 1,10,000/- |
| 8. | Total grant received | : | 70,000/- |
| 9. | Final expenditure | : | 79,954/- |
| 10. | Title of the project | : | Mahadaji Shinde Relation with the British (1727-1794) |

**11. Objectives of the Project :**

१. महादजी शिंदे यांची ऐतिहासिक पार्श्वभुमी.

२. महादजी शिंदेने पहिल्या इंग्रज–मराठा युद्धात भाग घेण्याची कारणे.

३. पहिल्या इंग्रज–मराठा युद्धातील महादजीची कामगीरी.

४. इ.स. १७८२ मध्ये झालेल्या सालबाईच्या तहातील महादजी शिंदेची भुमिका.

५. इ.स. १७८२ च्या सालबाईच्या तहानंतर महादजी शिंदेच्या राजकीय स्थितीचे अध्ययन करणे.

६. इंग्रज–मराठा संबंध प्रस्थापित करण्यामध्ये महादजी शिंदेचे योगदान.

**12. WHETHER OBJECTIVES WERE ACHIEVED (GIVE DETAILS)**

**Details of objectives are as given below**

१) महादजी शिंदेचा अभ्यास करतांनी या प्रकल्पात त्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट झाली आहे.

२) महादजी शिंदेने पहिल्या इंग्रज मराठा युद्धात भाग घेतला कारण महादजी शिंदे अतिशय शुर मराठा सरदार होते. होळकर, गायकवाड, पटवर्धन, यासारखेच ते पेशव्याचे मुख्य आधारस्तंभ होते. महादजी शिंदे शिवाय इंग्रजांना तोंड देणे शक्य नव्हते याची कल्पना नाना फडणविस व इतर मराठा सरदारांना सुद्धा होती यामुळेच महादजींना पहिल्या इंग्रज–मराठा युद्धात भाग घेणे अटल होते.

३) पहिल्या इंग्रज'मराठा युद्धात नाना फडणविसांनी महादजी शिंदेवर उत्तर भारतातील इंग्रजाशी युद्ध करण्याची जबाबदारी सोपविली होती. इ.स. १७७५ ते १७८२ पर्यंत महादजी शिंदेने याशस्वीपणे इंग्रजावर यश संपादन केले त्यामुळे महादजी शिंदेचा वर्चस्व व दारारा इंग्रजावर निर्माण झाला.

४) सालबाईच्या तहात मराठयाकडून महादजी शिंदे व इंग्रजाकडून एडंरसन यांनी महत्वाची भुमीका बाजवली. मराठा साम्राज्यात यावेळी इंग्रजाशी समझोता करण्याकरीता महादजी शिंदेपेक्षा दुसरा योग्य

व्यक्ती नसल्याची कल्पना पुणे दरबाराला होती. सालबाईचा अतिशय महत्वाचा तह महादजींनी घडवून आणला. हे त्यांचे कौशल्य वाखाण्यासारखे आहे.

५) १७८२ च्या सालबाईच्या तहानंतर महादजी शिंदे यांचे नाव वर्चस्व व दरारा संपूर्ण भारतामध्ये प्रसिद्धीस आले महादजी शिंदेची युद्धातील कामगीरी व तहातील भुमीका यामुळे गर्व्हनर जनरल वॉरेन हेस्टीग्ज सारखा गर्व्हनर जनरल देखील महादजीला घाबरत होता हे विशेष.

६) इंग्रज – मराठा संबंधाचा आढावा घेतांना महादजी शिंदेची भुमिका वाखाण्यासारखी आहे.

महादजी शिंदेला इंग्रज अधिकारी घाबरत होते जो पर्यंत महादजी जिवंत होते तो पर्यंत मराठयावर आक्रमण करण्याचा प्रयत्न कधीही इंग्रजानी केला नाही. जो पर्यंत महादजी जिवत होते (१९९४) इंग्रजांची मराठयावर आक्रमण करण्याची हिम्मत झाली नाही. परंतु महादजीच्या मृत्युनंतर (१७९४) अगदी थोडयाच अवधीत इंग्रजानी मराठा राज्य गिळकृंत केले. (१८१८)

## 13) Achievement form the project

प्रथम इंग्रज मराठा युद्धात महादजींच्या कर्तृत्वाचा व लष्करी सामर्थ्यांचा परिचय गर्व्हनर जनरल वॉरेन हेस्टिंग्ला झाला होता. एवढेच नव्हे तर महादजी शिंदे ही व्यक्ती माराठा राजकारणात किती महत्वाची आहे याची ओळख गर्व्हनर जनरल वॉरेन हेस्टिंगजला पुरेपूर झाली होती. १७ मे १७८२ रोजी महादजी शिंद्यामार्फत ठरलेल्या सालबाईच्या तहानंतर मराठयांविरूद्ध युद्ध करण्याचा विचार सुद्धा महादजी जिवंत असेपर्यंत इंग्रजांच्या मनात आला नाही. गर्व्हनर जनरल वॉरेन हेस्टिंग्ज नंतर मॅकफरसन, लॉर्ड कॉर्नवालीस, सर जॉन शोअर गर्व्हनर जनरल म्हणून भारतात आले व त्यांनी सुद्धा मराठयांशी सौम्य धोरण ठेवून मराठयांबरोबर वैमनस्य येणार नाही याची पुरेपूर दक्षता घेतली व भारतातील कोणत्याही राज्यकर्त्यांच्या राजकारणात हस्तक्षेप करण्याचे टाळले. या प्रमुख इंग्रज अधिकाऱ्यांच्या निर्णयाचा विचार केल्यास इंग्रज महादजींना किती वचकुन होते हे लक्षात आल्याशिवाय राहत नाही.

## 14) Summary of The Findings

इ.स. १७८२–९४ या कालखंडातील माहदजी इंग्रज संबंधाचा सूक्ष्म अभ्यास केल्यास असे आढळून येते की, महादजींचे–इंग्रजांशी संबंध सीमित होते. त्यात महादजींचा प्रमुख उद्देश मराठा हित हे होते. महादजी व्यक्तींचा विरोध करीत नव्हते तर मराठयांच्या बाबतीत विरोधी कारवायांचा खरा विरोध करीत होते. इंग्रज व महादजी एकमेकांना मनातून भीत असल्यामुळे कोणताही निर्णय घेतांना प्रथम परस्परांच्या बळाचा योग्य विचार दोघेही करीत होते. महादजी इंग्रज संबंध वरून सलोख्याचे वाटायचे परंतु तेवढेच आतून तीव्र शत्रुत्वाचे होते; हे अगदी सत्य आहे. जगातील बुद्धिमान व राजकीय मुत्सद्दी म्हणून इतिहासात अजरामर झालेल्या व्यक्तीचे कोणत्याही स्तरावरील संबंध पाहता आपणास हेच लक्षात येईल की त्यांचे परस्पर विरोधी संबंध बाह्यंगाने तीव्र कधीच नसतात. महादजी शिंदे मराठे शाहीतीलच नव्हे तर त्या काळात सपूर्ण हिंदुस्थानात इंग्रजांना शह देणारे एकमेव प्रभावी सामर्थ्यशाली मुत्सद्दी होते.

महादजी व इंग्रज यांच्या संबंधाचा आढावा घेतल्यास महत्वाची बाब प्रकर्षाने जाणवते की, जेव्हा महादजी इंग्रज संबंध आले त्याकाळी इंग्रजांनी हिदुस्थानातून आपले पूर्ण उच्चाटन होऊ न देता आपले स्थान कायम ठेवले. याउलट इंग्रजांसारख्यापरकीय शक्तीचा व्याप वाढत असतांना महादजींनी पतनाच्या गर्तेत जाणाऱ्या मराठेशाहीला बाहेर काढून पुनर्जीवन दिले. मराठा साम्राज्याच्या सभोवताल इंग्राजांसारख्या बलाढय शत्रूचा संचार असतांना सुद्धा मराठेशाहीला हिंदुस्थानात कायम ठेवण्याचे महान कार्य महादजींनी केले. महादजींच्या मृत्युनंतर मराठयांचे स्वातंत्र्य अल्पावधीतच नष्ट होऊन मराठेशाही नष्ट झाली. खरोखरच महादजींच्या मृत्युमुळे मराठा साम्राज्याचे भरून न निघणारे नुकसान झाले. महादजींचा मृत्यु हा निश्चितच मराठेशाहीला व तिच्या हिताला त्या काळात आणि भविष्यकाळातही अत्यंत दुःखद ठरला हयात शंका नाही. महादजींच्या मृत्युपासून मराठा सत्तेच्या ऱ्हासाला सुरूवात झाली. महादजी जर पुढे ५–६ वर्षे किंवा त्यापेक्षाही जास्त जगले असते तर इंग्रजांचे कटू डावपेच इतक्या अल्पावधीत यशस्वी ठरले नसते आणि मराठेशाहीचा अस्त इतक्या लवकर झाला नसता.

**15) Contribution to the society**

सर्वत्र महादजी शिंदेचा इतिहास समाजाकरिता नेहमीच उपयुक्त राहील.

**16) Whether any Ph.D. Enrolled/Produced out of the project: NO**

**17) NO. of Publications out of the project**

**Two Research Papers Published**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | Mahadaji Shinde and the Treaty of Salbai(17 May 1782) | Indian History Congress ISSN No. 22491937 | Depatment of History Social Sciences Building University of Delhi Dec. 2016 |
| २) | “महादजी शिंदे च्या नेतृत्वात मराठयांचा राजकीय प्रभाव | Vidharbha History Perished | Bhartiya Mahavidyalaya Amravati Feb 2017- |

**Signature of the Principal Investigator**
**(Dr. M.K. Chavhan)**

**Principal**
**Jawaharlal Nehru College, Wadi, Nagpur.**

File No. : 23-731/13 (WRO) dated 30/03/2015

Executive Summary

# सारांश

# महादजी—ब्रिटीश संबंध

## (Mahadaji Shinde Relaltion with the British 1727-1794)

## प्रकरण पहिले

## प्रस्तावना

पेशवाई उत्तरकाळात कर्तुत्ववान मराठा सरदारांची संख्या बोटावर मोजता येण्यासारखी होती. त्यातही बरेचशे सरदार आपआपली जहागीर व वतने सुरक्षित ठेवण्यासाठीच प्रामुख्याने धडपड करीत होते. त्यांच्या एकंदर वर्तणुकीवरुन व कार्यवाहीवरुन असे स्पष्ट दिसून येते की, त्यांची बांधिलकी, मराठयांच्या राज्याशी नसून ती प्रामुख्याने त्यांच्या जहागिरीशी होती. त्या जहागिरी सुरक्षित ठेवण्यासाठी ते वेळ प्रसंगी मराठा राज्याच्या शत्रुशीही संधान बांधण्यात कचरत नसत. परंतु याला अपवाद महादजी शिंदे होते. मराठा राज्याला धोका निर्माण होईल असे कोणतेही कृत्य महादजींच्या हातून घडले नाही. महादजी शिंदे यांनी आपल्या पराक्रमाबरोबरच मराठा राज्याबद्दल अढळ निष्ठेमुळे मराठयांच्या इतिहासात अनन्य साधारण महत्व प्राप्त केले आहे.

पानिपतच्या भीषण रणसंग्रामातून जिवंत परत आलेले महादजी शिंदे १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात मराठेशाहीचे प्रमुख आधारस्तंभ बनले. त्यांनी आपल्या कर्तुत्वाच्या बळावर पानिपतात नामशेष झालेली मराठयांची सत्ता व दरारा उत्तर भारतात पुन्हा पूर्ववत प्रस्थापित केला. माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दीत त्यांनी उत्तरेत बजावलेली कामगिरी अविस्मरणीय आहे. इ.स. १७७२ मध्ये महादजींनी इंग्रजांच्या आश्रयाला असलेल्या बादशहा शहाआलमला दिल्लीच्या तख्तावर पुन्हा आणून बसविले. तसेच पानिपतच्या पराभवाला प्रामुख्याने जबाबदार असलेल्या

नजीबखान रोहिल्याचा सूड घेऊन पानिपतातील पराभवाचा कलंक धुऊन काढला. ३० आगॅस्ट १९७३ रोजी झालेल्या नारायणराव पेशव्यांच्या खुनानंतर मराठा राज्यावर जी संकटाची पंरपरा कोसळली त्या संकटातून मराठा राज्याला उर्जितावस्थता प्राप्त करुन देण्यासाठी ज्या प्रमुख सदरारांनी अमूल्य कामगिरी केली, त्यात महादजी शिंदे यांचा क्रम प्रथम लागतो पानिपतच्या आघातातून मराठेशाही सावरते न सावरते तोच मराठयांना इंग्रजांशी युध्द करावे लागले. इ. स. १७७५ – १७८२ या काळात झालेल्या इंग्रज–मराठा युध्दात उत्तरेतील लष्करी धुरा महादजींनी यशस्वीपणे आणि खंबीरपणे सांभाळली. १७ मे १७८२ रोजी झालेल्या सालबाईच्या तहाच्या वाटाघाटीत मराठयांतर्फे महादजीने घेतलेल्या पुढाकारामुळे भारताच्या राजकारणत महादजीची प्रतिष्ठा आणि सन्मान वाढला.

## प्रकरण दुसरे

# संशोधन पध्दती

मानव केन्द्रबिंदु मानून सामाजिक क्षेत्रात अनेक संशोधने झालेली आहेत. त्यातूनच नियम, तत्वे यांचा शोध लागलेला आहे. संशोधनाची उद्दीष्टये, माहिती संकलन, नियंत्रण, साधने इत्यादी गोष्टी लक्षात घेऊन सामाजिक संशोधन पध्दतीचे वर्गीकरण करण्यात आले आहे. त्या वर्गीकरणानुसार संशोधन पध्दती तीन वर्गात वर्गीकृत करण्यात आली. संशोधन पध्दतीचे तीन प्रकार आहेत, जसे ऐतिहासिक पध्दती, सर्वेक्षण पध्दती व प्रायोगिक संशोधन पध्दती. परंतु, प्रस्तुत संशोधनकार्यात ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

### ऐतिहासिक पध्दती :—

ऐतिहासिक संशोधन ही सामाजिक शास्त्रामध्ये तथ्य मिळविण्याच्या अनेक पध्दतीमध्ये जुनी व उपयुक्त ठरलेली पध्दती आहे. ऐतिहासिक संशोधनाचे उद्दिष्टये वर्तमान घटनांचा अर्थ लावण्याच्या दृष्टीने संदर्भ म्हणून भूतकाळातील घटनांचा मागोवा घेणे हे आहे. इतिहास संशोधन अंतिम महत्वाचे काही असेल तर ते म्हणजे संसाधनांचे संकलन होय. अनेक प्रकारची संसाधने उपलब्ध होत असतात. त्यातून त्यांची विश्वसनीयता प्रथम सिध्द व्हावी लागते. इतिहासातील साधने निर्माण केली जात नहीत तर ती कोठेतरी अस्तित्वात असतातच. प्रयत्नांच्या सहयाने ती उजेडात आणली जातात. अर्थात ऐतिहासिक काळ जितका दूरचा असेल तितके साधन मिळविणे अतिशय अवघड असते. अशी साधने महत्प्रयासाने मिळवून घेतल्यानंतरही त्यांची विश्वसनीयता ठरविणे हे काम त्यापेक्षाही अवघड व महत्वाचे असते की, अशाप्रकारचे एखादे साधन उपलब्ध करुन देणा—या व त्याचे साधनत्व सिध्द करणा—या इतिहास संशोधकाचे मोठेपण मान्य करावेच लागेल.

ऐतिहासिक संशोधन कालचा विचार करते, सर्वेक्षण आजचा तर प्रायोगिक संशोधनाची दृष्टी उदयावर असते. पहिल्यात भूतकाळाचा मागोवा, दुस—यात वर्तमानकाळाचा बोध तर तिस—यात भविष्याचा शोध असतो. अर्थात सामाजिक संशोधनात वैज्ञानिक पध्दतीचा उपयोग करणे आवश्यक आहे व या पध्दतीचा उपयोग केलया जात असला तरी इतर पध्दतीच्या मर्यादा लक्षात घेता काही बाबी अथवा घटनांचे स्वरुपच असे असते की, त्यात इतर पध्दती निरुपयोगी ठरतात. प्राचीन काळी घडलेल्या घटनांची मीमांसा करतांना इतर कोणत्याच अभ्यास पध्दती उपयोगी ठरत नाहीत. तेव्हा भूतकालीन घटनांचा अभ्यास कोणत्या शास्त्रीय पध्दतीने करावयाचा या प्रश्नाचे उत्तर केवळ इतिहास संशोधनातून प्राप्त होते. म्हणूनच ऐतिहासिक अध्ययनाला संशोधनातील स्थान उच्चस्तरीय मानले जाते.

ऐतिहासिक संशोधनात गतकालीन घटनांचा मागोवा घेतला जातो. त्याचे स्वरुप कितीही गुंतागुंतीचे व अस्पष्ट असले तरीही त्याचा गुंता सोडविणे हे एक आव्हानच असते. इतिहास संशोधनात संसाधने अनेक प्रकारची असतात. उदा. शस्त्रे, नाणी, पत्रे, कबुलायती, खेळ, करारनामे, दानपत्रे, शिलालेख, शिल्पकृती, मूर्ती, विविध दस्तऐवज, हत्यारे इत्यादी. या संसाधनांच्या चिकित्सेला अतिशय महत्व असते. या प्रत्येकाची परीक्षा करण्याचे अनेक निकष असतात. त्यांची माहिती व निष्पत्ती हा इतिहास संशोधनाचा पाया होय.

प्रस्तुत संशोधनकार्यात ऐतिहासिक पध्दतीने संशोधन केलेले आहे व अहवाल लिहितांना संशोधकाने तीक्ष्ण दृष्टी, स्पष्टता, अचुकता, नेमकेपणाचा अवलंब केला आहे. ऐतिहासिक पध्दतीत इतिहासकालीन घटना, समाज, शासन, विचारपध्दती, सामाजिक, आर्थिक, भौतिक घटनांचा प्रभाव असतो. त्यामुळे हया सर्व गोष्टींचा एकाकी विचार न करता हया सर्वांचे परस्पर संबंध लक्षात घेण्यात आले.

## <u>प्रकरण तिसरे</u>

# <u>महादजी शिंदे (१७८२–१७८६)</u>

उत्तर भारतात मराठयांचे वर्चस्व कायम टिकविण्यासाठी दिल्लीवर मराठयांचा अधिकार असणे अत्यंत आवश्यक आहे हे महादजींनी अचूक ओळखले होते. दिल्ली जर मराठयांच्या अधिपत्याखाली आणावयाची असेल तर माळवा आणि बुंदेलखंडात मराठयांचा पाया मजबूत असणे आवश्यक आहे याची जाणीव महादजींना होती. त्यामुळे ग्वाल्हेर व गोहद ही स्थळे हाती आल्यानंतर महादजींनी आपले लक्ष दिल्लीच्या राजकारणाकडे वळविले. पहिल्या पायरीवर पाय पक्के रोवल्यानंतरच पुढे पाऊल टाकावे अशी महादजीची सावध नीती होती.

इ. स. १७८४ च्या डिसेबंर महिन्यात बादशहा शहाआलम याला सर्वतोपरी सहाय्य देऊन दिल्लीवर मराठयांचे वर्चस्व महादजींनी प्रस्थापित केले व बादशहाकडून ''वकील–ए–मुतालिक'' हा सर्वोच्च किताब पेशव्यांच्या वतीने प्राप्त केले. यावरुन त्यांची मराठयांच्या त्यावेळच्या केन्द्रीय सत्तेविषयी म्हणजेच पेशव्यांच्याप्रति निष्ठा प्रकट होते. या अत्युच्च किताबामुळे महादजीपुढे काहीशी चमत्कारिक परिस्थिती निर्माण झाली. चमत्कारिक या अर्थाने की मुतालिकीचा किताब पेशव्यांच्या नावाने मिळाला होता. पण त्याच्या अंमलबजावणीचे उत्तरदायीत्व मात्र पूर्णत: महादजीवर होते. शिवाय नानांशी त्यांचे सूत जुळत नसल्यामुळे ही जबाबदारी पार पाडण्यासाठी आवश्यक ते सहाय्य मिळण्याची संभावना कमीच होती. दिल्लीच्या बादशहाचा संपूर्ण कारभार करण्याची जबाबदारी यामुळे त्यांच्यावर आली. त्यावेळी पैशाची टंचाई ही त्यांना भेडसावणारी प्रमुख समस्या होती. साधने अत्यंत अल्प व शत्रु मात्र भरपूर अशी महादजींची मोठी बिकट स्थिती होती. दिल्ली दरबारात मिळालेले मानाचे स्थान व दर्जा यामुळे त्यांना अनेक शत्रु निर्माण झाले. मोगल बादशहा अडचणीत व संकटात आले असता, त्यांना दिलेल्या आश्वासनासाठी महादजींनी आपल्या कर्तव्याला जागून बादशहाच्या शत्रुंशी मराठेशाहीच्या परंपरेला शोभेल असा लढा दिला. या प्रसंगी स्वत:चा स्वार्थ

न पाहता बादशहाला शेवटपर्यंत सुरक्षित ठेवून त्यांचे दिल्लीतील स्थान स्थिर राहावे याकरीता त्यांनी कसून प्रयत्न केले. हे करीत असतांना आपल्या कर्तव्याची जाणीव सतत बाळगली.

इंगजांशी सलोख्याचे संबंध ठेवून आपण स्वतंत्रपणे उत्तर भारताचा कारभार करावा असा महादजींचा विचार होता असा त्यांच्यावर आरोप करण्यात येतो. परंतु हा आरोप निरर्थक आहे. कारण इंग्रज–मराठा युध्दात उत्तर भारतात मराठयांचे लष्करी आधार प्रामुख्याने महादजीच होते. इंग्रज मराठा युध्दात इंगजांच्या डोळयात सलणारा काटा म्हणजे महादजी. उत्तर भारतात मराठयांची सत्ता महादजींच्या बळावर टिकून आहे हे इंग्रज पुरेपुर ओळखून होते आणि म्हणूनच पुणे दरबारपासून महादजींना फोडण्याचे प्रयत्न गर्व्हनर जनरल वॉरेन हेस्टिंग्जने अनेकदा केले. पुणे दरबार आणि महादजी यांच्यात फुट पाडून दोहोंनाही दुबळे बनवायचे आणि नंतर दोहोनाही वेगवेगळे गाठुन खच्ची करायचे ही इंग्रजांची कुटनीती होती. परंतु त्यात त्यांना यश आले नाही. इंग्रजांचे वर्चस्व महादजींना मान्य करायचे असते तर डी–बायन सारख्या फ्रेंच सेनापातीला चाकरीत ठेवुन कवायती लष्कर पदरी बाळगण्याची त्यांना काहीच गरज नव्हती.

# प्रकरण चौथे

# महादजी शिंदे (इ.स.१७८६–१७९४)

महादजी शिंदे यांनी सालबाईच्या तहानंतर दिल्ली, माळवा व बुंदेलखंडच्या राजकारणाकडे आपले लक्ष वेधले. सन १७८३ मध्ये ग्वाल्हेरच्या किल्ला व १७८४ मध्ये गोहदचा किल्ला जिंकला परंतु महादजी समोर मुख्य अडचण पैशाची होती ती बुंदेलखंडातील पन्ना व बांदा राज्यातील वारसा युध्दात मदत केल्यामुळे पुर्ण झाली. महादजीने लालसोटच्या युध्द भुमिवरुन माघार घेतल्यामुळे विजसिंहाने अजमेर जिंकुन (१७८७) महादजी विरुध्द संघ तयार करण्याचा प्रयत्न केला त्याला यश आले नाही.

इ.स. १७८८–८९ मध्ये परिस्थीती झपाटयाने बदलली. महादजीने फ्रेंच अधिकारी डी. बायनच्या मदतीने आपल्या सैन्याला युरोपीयन पध्दतीचे प्रशिक्षण दिले. यामुळे विजयसिंह अतिशय घाबरला व महादजीशी समझोता करण्याचा प्रयत्न केला पण महादजीने स्पष्ट नकार दिला.

इ.स. १७९० मध्ये राजपूताच्या विरुध्द दोन बाजुनी सैन्य वाठविले व तुकोजी होळकर वर शिख व रोहल्याचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी सोपविली. दिनांक २० जुन १७९० रोजी पाटन चे निर्णायक युध्द होऊन राजपूताचा दणदणीत पराभव झाला. अशाप्रकारे इ.स. १७९२ पर्यंत महादजी राजस्थानचे एकमात्र शास्ते होवुन बसले. यानंतर महादजी पुण्याकडे निघाले पेशवा सवाई माधवराव यांची गणेशखिंड येथे भेट घेतली. (१३ जुन १७९२)

इतिहासकार सरदेसाई, मॅलेसन, बसु अलफ्रेंड लॉयल यांच्या मते, महादजींचा पुण्याला येण्यामागे त्यांचा देशी राज्यकर्त्याची आघाडी निर्माण करुन इंग्रजांना देशाबाहेर घालविण्याचा उद्‌देश होता. परंतु लवकरच महादजीची प्रकृती बिघडली. १२ फेब्रुवारी १७९४ प्राणोत्क्रमण झाले.

# प्रकरण पाचवे

## मुल्यमापन

प्रथम इंग्रज मराठा युद्धात महादजींच्या कर्तृत्वाचा व लष्करी सामर्थ्यांचा परिचय गर्व्हनर जनरल वॉरेन हेस्टिंग्ला झाला होता. एवढेच नव्हे तर महादजी शिंदे ही व्यक्ती माराठा राजकारणात किती महत्वाची आहे याची ओळख गर्व्हनर जनरल वॉरेन हेस्टिंगजला पुरेपूर झाली होती. १७ मे १७८२ रोजी महादजी शिंद्यामार्फत ठरलेल्या सालबाईच्या तहानंतर मराठयांविरूद्ध युद्ध करण्याचा विचार सुद्धा महादजी जिवंत असेपर्यंत इंग्रजांच्या मनात आला नाही. गर्व्हनर जनरल वॉरेन हेस्टिंग्ज नंतर मॅकफरसन, लॉर्ड कॉर्नवालीस, सर जॉन शोअर गर्व्हनर जनरल म्हणून भारतात आले व त्यांनी सुद्धा मराठयांशी सौम्य धोरण ठेवून मराठयांबरोबर वैमनस्य येणार नाही याची पुरेपूर दक्षता घेतली व भारतातील कोणत्याही राज्यकर्त्यांच्या राजकारणात हस्तक्षेप करण्याचे टाळले. या प्रमुख इंग्रज अधिकाऱ्यांच्या निर्णयाचा विचार केल्यास इंग्रज महादजींना किती वचकुन होते हे लक्षात आल्याशिवाय राहत नाही.

इ.स. १७८२–९४ या कालखंडातील माहदजी इंग्रज संबंधाचा सूक्ष्म अभ्यास केल्यास असे आढळून येते की, महादजींचे–इंग्रजांशी संबंध सीमित होते. त्यात महादजींचा प्रमुख उद्देश मराठा हित हे होते. महादजी व्यक्तींचा विरोध करीत नव्हते तर मराठयांच्या बाबतीत विरोधी कारवायांचा खरा विरोध करीत होते. इंग्रज व महादजी एकमेकांना मनातून भीत असल्यामुळे कोणताही निर्णय घेतांना प्रथम परस्परांच्या बळाचा योग्य विचार दोघेही करीत होते. महादजी इंग्रज संबंध वरून सलोख्याचे वाटायचे परंतु तेवढेच आतून तीव्र शत्रुत्वाचे होते; हे अगदी सत्य आहे. जगातील बुद्धिमान व राजकीय मुत्सद्दी म्हणून इतिहासात अजरामर झालेल्या व्यक्तीचे कोणत्याही स्तरावरील संबंध पाहता आपणास हेच लक्षात येईल की त्यांचे परस्पर विरोधी संबंध बाह्यंगाने तीव्र कधीच नसतात. महादजी शिंदे मराठे शाहीतीलच नव्हे तर त्या काळात सपूर्ण हिंदुस्थानात इंग्रजांना शह देणारे एकमेव प्रभावी सामर्थ्यशाली मुत्सद्दी होते.

महादजी व इंग्रज यांच्या संबंधाचा आढावा घेतल्यास महत्वाची बाब प्रकर्षाने जाणवते की, जेव्हा महादजी इंग्रज संबंध आले त्याकाळी इंग्रजांनी हिदुस्थानातून आपले पूर्ण उच्चाटन होऊ न देता आपले स्थान कायम ठेवले. याउलट इंग्रजांसारख्यापरकीय शक्तीचा व्याप वाढत असतांना महादजींनी पतनाच्या गर्तेत जाणाऱ्या मराठेशाहीला बाहेर काढून पुनर्जीवन दिले. मराठा साम्राज्याच्या सभोवताल इंग्राजांसारख्या बलाढय शत्रूचा संचार असतांना सुद्धा मराठेशाहीला हिंदुस्थानात कायम ठेवण्याचे महान कार्य महादजींनी केले. महादजींच्या मृत्युनंतर मराठयांचे स्वातंत्र्य अल्पावधीतच नष्ट होऊन मराठेशाही नष्ट झाली. खरोखरच महादजींच्या मृत्युमुळे मराठा साम्राज्याचे भरून न निघणारे नुकसान झाले. महादजींचा मृत्यु हा निश्चितच मराठेशाहीला व तिच्या हिताला त्या काळात आणि भविष्यकाळातही अत्यंत दु:खद ठरला हयात शंका नाही. महादजींच्या मृत्युपासून मराठा सत्तेच्या ऱ्हासाला सुरूवात झाली. महादजी जर पुढे ५—६ वर्षे किंवा त्यापेक्षाही जास्त जगले असते तर इंग्रजांचे कटू डावपेच इतक्या अल्पावधीत यशस्वी ठरले नसते आणि मराठेशाहीचा अस्त इतक्या लवकर झाला नसता.